# दिनांक 14/03/2025

1 रसायनी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 12/03/2025 रोजी 17:30 वा च्या सुमारास मौजे हिरानंदानी फोरच्यून सिटी भोकरपाडा, पनवेल येथे फिर्यादी रा.मेलोना 2703 अॅटल्स बिल्डींग रूम नं.2701 हिरीनंदानी फोरच्यून सिटी सेक्टर ए भोकरपाडा, पनवेल यांचे कडे साफसफाईचे काम करणा-या मोलकरीन यांना कामाचे कमी पैसे दिल्याचा राग मनात धरुन व खोटे आरोप करून फिर्यादी यांना महिला आरोपी हिचा भाउ व इतर 3 ते 4 अनोळखी इसमांनी फिर्यादी यांना शिविगाळी करून हाताबुक्क्यांनी व काठीने मारहान करून फिर्यादीला दूखापत केली.

याबाबत रसायनी पोलीस ठाणे गुरनं.61/2025, बी.एन.एस.189(3),191(2),190,118(1,115(2),352,351(2)प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोसई/श्रीमती ढोणे हे करीत आहेत.

2. खालापूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 13/03/2025 रोजी 00:40 वा च्या सुमारास मौजे हाळ खुर्द गावच्या येथील युकेज रिसॉर्ट चे शेजारी ता.खालापुर येथे 11 आरोपीत व इतर 50 ते 60 अनोळखी आरोपी यांनी गोवंश जातीची जनावरे कत्तलीकरीता आणुन त्यातील काही जनावरांची कत्तल करुन त्यांचे मांस , कातडी, शिंगे, एका खडयामध्ये टाकुन दिले. व उर्वरीत तीन बैल व एक गाय यांना कत्तली करीता डांबुन ठेवल्याची गोरक्षकांची खात्री झाल्याने त्यांनी त्या बैलांची व गायींची सुटका करुन पोलीसांचे सोबत त्यांना गोशाळेत घेवुन जात असताना हाळ येथील आरोपींनी बेकायदेशीर जमाव जमवुन पोलीसांनी दिलेल्या आदेशाचे पालन न करता सरकारी कामात अडथळा आणुन गोरक्षक यांना जिवेठार मारण्याचे उददेशाने त्यांचेवर दगड फेक करुन लाकडी दांडक्यांनी मारहाण करुन दुखापत केली तसेच पोलीसांवर दगडफेक करुन दुखापती केल्या . सदर गुन्ह्यातील 12 आरोपी यांना दिनांक 13/03/2025 रोजी 22:19 वा च्या सुमारास अटक करण्यात आली आहे.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे गुरनं.87/2025, भारतीय न्याय संहिता कलम 109, 132,121,(1),118(1),189,189(2),189(3),189(4),189(5),190,191(1)सह महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम 1976 चे कलम 5 चे उल्लंघन कलम 9,11 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सपोनि/श्री.संतोष आवटी हे करीत आहेत.

3. खालापूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 12/03/2025 रोजी 23:00 वा च्या सुमारास मौजे पुणे

मुंबई जुन्या हायवे रोडवर घोडवली गावच्या हददीत नवीन माउली ढाब्या जवळ ता.खालापुर येथे फिर्यादी हे खालापूर येथुन खोपोली येथे त्याचे स्वत:चे मालकीची युनिकॉर्न मोटारसायकल क्रमांक एम.एच. 46 ए.एन. 726 ही स्वत: चालवित घेवुन व मागे त्यांचा भाचा याला पाठीमागे बसवुन जात असताना रात्री 23.15 वाजण्याच्या सुमारास मुंबई पुणे जुन्या हायवेवरील घोडवली गावच्या हददीत नवीन माउली ढाब्यासमोर आलेवेळी पाठीमागुन येणारी पिकटप जीप क्रमांक एम.एच.46 बी.एम.क्र.6097 ही वरील आरोपी चालक याने त्याच्या ताब्यातील पिकअप जिप ही हयगयीने, बेदरकारपणे, चालवुन यांतील फिर्यादी यांच्या मोटारसायकलला पाठीमागुन ठोकर मारुन अपघात करुन फिर्यादी व त्यांचा भाचा अमित देसाई याच्या लहान मोठया गंभीर स्वरुपाच्या दुखापतीस कारणीभुत झाला.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे गुरनं.88/2025, मोटार वाहन अधिनियम,1988 चे कलम 184, भारतीय न्याय संहिता कलम 281,125(A) प्रमाणेगुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/निलेश कांबळे हे करीत आहेत.

4. पाली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 10/03/2025 रोजी 08:00 वा च्या सुमारास मौजे फिर्यादी यांचे राहते घरातुन मौजे महाबाव, सुधागड येथून महिला फिर्यादी याची मुलगी वय-16 वर्षे 2 महिने 10 दिवस हि अल्पवयीन आहे हे माहीत असताना तिचे अज्ञानपाणाचा लहाणपनाचा फायदा घेवुन कोणीतरी अज्ञात इसमाने तिस फिर्यादीचे कायदेशीर रखवालीतुन संमत्तीशिवाय फुस लावुन पळवुन नेले.

याबाबत पाली पोलीस ठाणे गुरनं.24/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 137(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोह/म्हात्रे हे करीत आहेत.

5. खोपोली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 10/03/2025 रोजी 18:50 वा च्या सुमारास मौजे सारसण गावचे हद्दीत आलाना कंपनीचे गेटसमोर खोपोली, येथे आरोपीत रा.बदलापुर वेस्ट, शांतीनगर, ठाणे मुळ रा.78, नंदेसर पो.मित्तपुर ता.बलिएपुर जि.आजमगढ रा.उत्तरप्रदेश याने त्याचे ताब्यातील मोटार सायकल क्र. एम.एच.05.एई.8670 ही मोटार सायकलवर ट्रिपल सिट घेवुन खोपोली बाजुकडुन पेण बाजुकडे जात असताना मोटार सायकल ही अतिवेगाने, हयगयीने, अविचाराने, रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लेक्ष करून धोकादायक रित्या चालवुन रस्ता आलोंडणारा पादचारी इसम नामे जलील अहमद मोहम्मद नाटे वय-45 वर्षे रा.रूम नं.4, प्लॉट नं.4, अजमेरी गली, हबीबीया मज्जीद गौतम नगर, गोवंडी मुंबई यास ठोकर मारून अपघात करून अपघातनंतर मोटार सायकल ही रोडवर पडुन घसरत जावुन अपघात होवुन अपघातात पादचारी इसम जलील अहमद मोहम्मद नाटे वय-45 वर्षे याचे साध्या दुखापतीस तसेच स्वता:चे व मोटार सायकलवरील प्रवासी नामे रोशन देविदास शिंदे वय-20 वर्षे रा.मु.डोळमवाडी पो.चिखली ता.डिगरस जि.यवतमाळ व अजय गणेश गायकवाड वय-21 वर्षे रा.प्लॅट नं.202, हर्ष अपार्टमेंट ओप्प, अनघा बिल्डिंग, बदलापुर वेस्ट, शांतीनगर, ठाणे याचे गंभीर दुखापतीस व स्व:ताचे मरणास व मोटार सायकलच्या नुकसानीस कारणीभुत झाला.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे गुरनं.78/2025, मोटार वाहन अधिनियम,1988 184, 128/177, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 106(1),281,125(a),125 (b) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोह/सावंत हे करीत आहेत.

6. पेण पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 13/03/2025 रोजी 16:00 वा च्या सुमारास मौजे आंबेगाव ता.पेण येथे महिला फिर्यादी या त्यांचे बहिणीचे घरी असतांना आरोपीत रा.पोचदार सोसायटी, डिकसळ ता.कर्जत हा तेथे येवुन फिर्यादि यांना माझे सोबत घरी चल असे बोलु लागला फिर्यादि यांनी त्याला त्याचे सोबत जाणेस नकार दिल्याने आरोपीत याला त्याचा राग येवुन फिर्यादि हिस शिवीगाळ करुन हाताबुक्कयानी मारहाण केली व अंगणात पडलेली विट फिर्यादि हिचे डोक्यात फेकुन मारुन दुखापत करुन जिवीत किंवा व्यक्तिगत सुरक्षितता धोक्यात आणणारी कृती केली.

याबाबत पेण पोलीस ठाणे गुरनं.42/2025, BNS 118(1),125,115,352 प्रमाणेगुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सफौ/श्री.ढोबळे हे करीत आहेत.

7. खालापूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 13/03/2025 रोजी 17:50 वा च्या सुमारास मौजे हाळ बुद्रुक गावाचे हददीत म्हडा कॉलनीचे मागील बाजुस मोकळया जागेतील ता.खालापुर येथे कोणीतरी अज्ञात इसमाने कोणत्याही तरी जनावरास ठार मारुन त्याचे कवठया हाडे सुकलेली कातडी असे अवषेश हा हाळ बुद्रुक गावाचे हददीत म्हडा कॉलनीचे मागील बाजुस मोकळया जागेतील गवतात फेकुन दिलेले आहेत.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे गुरनं. 89/2025, भारतीय न्याय संहिता कलम 2023 चे कलम 325 सह महाराष्ट्र पोलीस अधिनीयम 1951 चे कलम 119 सह प्राणी क्रुरतेने वागवीन्यास प्रतिबंद 1960चे कलम 11 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/ सावंत हे करीत आहेत.

8 महाड तालुका पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 30/04/2024 रोजी 00:00 वा ते दि. 11/03/2025 रोजी 00:00 वा च्या दरम्यान मौजे महिला फिर्यादी छत्रीनीजामपुर आदीवासीवाडी येथे राहत्या घरी ता.महाड पिडीत मुलगी ही अल्पवयीन असल्याचे आरोपीत रा.छत्रीनीजामपुर आदीवासीवाडी ता.महाड यास माहीत असुन सुध्दा आरोपीत याने पिडीत/ फिर्यादी मुलीची ईच्छा नसताना तिचे सोबत वारंवार शारीरीक संबंध केल्याने त्यात ती गरोदर होवुन तीस मुलगा झाला

याबाबत महाड तालुका पोलीस ठाणे गुरनं.10/2025, बाल लै.अत्या.संरक्षण (POCSO) अधिनियम, 2012 चे कलम 4,6,12, भारतीय न्यास संहिता 2023 चे कलम 64(2)(m),65(1) प्रमाणेगुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/कुशल खेडेकर हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 13.03.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 222 इसमावर कायदेशीर कारवाई

करण्यात आली असून त्यांच्याकडून  2,22,900/-रुपये इतका दंड आकारला आहे.